| | | |
|---|---|---|
| | सत्यमेव जयते<br>**जाहिरात सन २०२५-२६**<br>**राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत** | |
| **कार्यालय : राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, अजनी नागपूर** | | |

## राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र,अजनी रोड,नागपूर.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र,नागपूर अजनी रोड, नागपूर येथील आय.आर.एल.प्रयोगशाळेतील सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ -०२ पदे तसेच मोबॉईल एक्सरे वाहनाकरीता क्षकिरण तंत्रज्ञ -०१ या रिक्त पंदाची, (Microbiologist for IRL/C&DST and EQA) X-ray Technician (X-ray Mobile Van) (एक्सरे तंत्रज्ञ) या पदांची कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती प्रक्रिया राबविण्यात येत आहेत.

सदरील पदभरतीची जाहिरात, पदांची संख्या, आवश्यक अईता, अनुभव, सामाजिक आरक्षण, नियुक्तीचे ठिकाण, अर्जाचा नमुना, नियम व अर्टी व शर्ती हया राष्ट्रीय आरोग्य अभियान,राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई येथील संकेतस्थळ (www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in ) वर प्रसिध्द करण्यात आलेले असून उमेदवारांनी संकेतस्थळावरुन अर्जाचा नमुना Download करुन,जाहिरातीमधील नमुद आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह अर्ज प्रमुख वैद्यकीय अधिकारी, राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, अजनी रोड,नागपूर (शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसर टी.बी.वार्ड ) येथे समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने अथवा कुरिअरने पाठविणेसाठी या निवेदनाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

प्रमुख वैद्यकीय अधिकारी
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र,
नागपूर

Scanned with OKEN Scanner

(2)

# जाहिरात सन २०२५-२६
## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत

**कार्यालय :- राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, टी.बी.वार्ड परीसर,अजनी नागपूर ४४०००३**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणा-या राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमासाठी खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात संवर्गनिहाय भरण्यासाठी खाली नमुद पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

<u>राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, अजनी रोड, नागपूर.</u>

| अ. क्रं. | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | प्रवर्ग व पद संख्या | नियुक्ती चे ठिकाण | शैक्षणिक पात्रता व अनुभव | वयोमर्यादा | दरमहा एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | Microbiologist for IRL/C&DST Or EQA (सुक्ष्मजिवशास्त्रज्ञ) | ०२ | विजा-अ ०१ इमाव -०१ | राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | M.D. Microbiology (or) PhD Medical Microbiology/Applied microbiology/General Microbiology or related field **(OR)** M.Sc.Medical Microbiology/Applied Microbiology /General Microbiology Preference will be given with 5 years experinced. In Bacteriology Preference will be given to M.D. Candidate | उमेदवाराचे ४३ वर्ष व NHM अंतर्गत कार्यरत उमेदवारांना वयाची अट नाही परंतु जास्तीत जास्त वय मार्गदर्शक सुचना प्रमाणे | ७५०००/- <br> ४००००/- |
| २ | X-ray Technician (X-ray Mobile Van) (एक्सरे तंत्रज्ञ) | ०१ | खुला - ०१ | राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, नागपूर | 12th Pass with Science,Diploma in Radiography (From Recognixed Institute) National Health Mission मध्ये X-ray Technician या पदावर काम केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. | खुला ३८ वर्षे व राखीव संवर्गाकरीता ४३ वर्ष व NHM अंतर्गत कार्यरत उमेदवारांना वयाची अट नाही परंतु जास्तीत जास्त वय मार्गदर्शक सुचना प्रमाणे | १७०००/- |

Scanned with OKEN Scanner

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र, अजनी नागपुर, अंतर्गत आय.आर.एल.प्रयोगशाळेतील रिक्त असणा-या सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ व क्षकिरण तंत्रज्ञ या पदांसाठी जाहिरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर रिक्त पदांसाठी अर्ज स्विकारण्याची मुदत दिनांक ०५.०३.२०२६ पासुन ते दिनांक १६.०३.२६ रोजी सकाळी १०.३० वाजेपासुन ते ५.४५ वाजेपर्यत (शनिवार व रविवार तसेच शासकीय सुटटीचे दिवस वगळून ) स्विकारण्यात येतील. तसेच दिनांक १६.०३.२६ नंतर उमेदवारांच्या प्राप्त होणाऱ्या अर्जाचा भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. तसेच ईमेलद्वारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही. अर्ज समक्ष अथवा रजिस्टर डाकेद्वारे/ कुरियरने पाठवावे.

**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण :-**

**राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केद्र अजनी रोड, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय परिसर टी.बी.वार्ड नंबर ४४ नागपूर ४४०००३**

दिनांक व वेळ :-

अर्ज करण्याचा दिनांक ०५.०३.२६ **ते दिनांक** १६.०३.२६ पर्यत सकाळी १०.३० वाजेपासुन ते ५.४५ वाजेपर्यत (शनिवार व रविवार तसेच शासकीय सुटटीचे दिवस वगळून) कार्यालयात स्वीकारण्यात येईल.

**अटि व शर्ती:-**

१) उपरोक्त नमुद केलेली कंत्राटी पदे ही ११ महिने २९ दिवस या कालावधीसाठी कंत्राटी तत्वावर कराराद्वारे भरण्यात येत आहे. सन २०२६-२०२७ च्या कृती आराखडयामध्ये सदर पदाची मंजुरी प्राप्त न झाल्यास वरील पदाची सेवा आपोआप संपुष्टात येईल. परंतु वरील पद सन २०२६-२७ मध्ये मंजुर झाल्यास पुढील ११ महिने २९ दिवसाची नियुक्ती समाधानकारक कार्यकालानंतर देण्यात येईल.

२) **सुक्ष्मजीवशास्त्रज्ञ** पदाकरीता (**खुल्या प्रवर्ग रु.४००/- व मागास प्रवर्ग उमेदवारांसाठी रु. ३००/-) तसेच (क्ष-किरण तंत्रज्ञ पदाकरीता)(खुल्या प्रवर्ग रु.३००/- व रु.२००/-मागास प्रवर्गा करीता)** इतक्या रकमेचा नोंदणी शुल्क सोबत जोडण्यात आलेल्या QR (State T.B.Control & Training Centre Nagpur) Or UPI ID 9823312803 @ sbi द्वारे अदा करावयाचे आहे. तसेच नोंदणी शुल्क अदा केल्याचा Transaction ID No- पोच पावती (Payment slip) अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत शुल्क अदा केल्याची पोच पावती सादर न केल्यास सदरील अर्ज बाद करण्यात येईल याची उमेदवाराने नोंद घ्यावी.

३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये दिलेल्या पदस्थानेच्या ठिकाणात बदल होणार नाही.

४) केंद्रं/राज्य शासनाने संबंधित पद नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

५) सर्व पदांसाठी उमेदवारांची सर्व शैक्षणिक अर्हतेची कागदपत्रे, तसेच पदवीचे सर्व गुणपत्रक (पहिले वर्ष ते अंतिम वर्ष) पदवी प्रमाणपत्र, नोंदणी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र,वय अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, वयाचा पुरावा म्हणूण (इयत्ता १० व १२ वीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, जन्माचा दाखला) ही सर्व कागदपत्रे अर्जासोबत झेरॉक्स प्रतीत (साक्षांकित / स्वसाक्षांकित) जोडावीत. तसेच तांत्रिक स्वरुपाचे पद असल्यास त्यांचे संबधित राज्यस्तरीय परीषदेकडे नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.नावात बदल असल्यास राजपत्र, विवाह नोंदणी आणि नोटराईज्ज ॲफिडेव्हीट जोडणे बंधनकारक राहील.

Scanned with OKEN Scanner

६) एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवाराने स्वतंत्र अर्ज व स्वतंत्र नोंदणी शुल्क अदा केल्याचा Transaction ID No. पोच पावती( Payment slip) अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. अर्जासोबत शुल्क अदा केल्याची पोच पावती सादर न केल्यास सदरील अर्ज बाद करण्यात येईल याची उमेदवाराने नोंद घ्यावी.तसेच उमेदवाराने कोणत्या पदासाठी अर्ज केला त्याचा उल्लेख सोबत जोडलेल्या अर्जामध्ये नमुद करणे आवश्यक आहे.

७) (अ) **शैक्षणिक अर्हता पात्रता** :-

* शैक्षणिक अर्हतेबाबतचा सविस्तर व अचूक तपशिल नोंद करावा.
* अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेली किमान शैक्षणिक पात्रता धारण असणे आवश्यक आहे.
* आवश्यक शैक्षणिक अर्हता ज्या तारखेस प्राप्त केली आहे ती तारीख अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. (निकाल घोषीत केल्याचा दिनांक)
* अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य **श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे आवश्यक आहे.** अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रुपांतर करुन ते प्रमाणित करुन घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत आपण पात्र झाल्यास छाननी दरम्यान पडताळणीकरीता मुळ दस्तऐवज सादर करावी.
* **अर्जात एकूण प्राप्त गुण नमुद न करता गुणांची अचुक टक्केवारी नमुद करावी.** शैक्षणिक प्रमाणपत्रातं नमूद गुणंची टक्केवारी व अर्जात नमुद टक्केवारी न जुळल्यास असे अर्ज नामंजूर करण्यात येतील.
* **अर्जात नमूद केलेल्या सर्व शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्र/कागदपत्र आपण सदर पदासाठी पात्र झाल्यास छाननी दरम्यान मुळ दस्तऐवज सादर करणे अनिवार्य राहिल. दरम्यान आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या गुणपत्रिका न जोडल्यास नमूद केलेली माहिती न जुळल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.**
* पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता/पात्रता ही " विद्यापीठ अनुदान आयोग " मान्यताप्राप्त विद्यापीठातूनच प्राप्त केलेली असणे आवश्यक आहे. इतर विद्यापीठातून घेतलेली शैक्षणिक अर्हता/पात्रता ग्राहया धरण्यात येईल.
* अर्ज सादर करावयाच्या शेवटच्या तारखेस उमेदवाराकडे पदाकरीता आवश्यक किमान शैक्षणिक पात्रता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

**(ब) अनुभव :-**

- अर्ज करीत असलेल्या पदाकरीता विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अतिरिक्त आवश्यक शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतरचाच अनुभव ग्राहय धरण्यात येईल त्यानुसार शैक्षणिक अर्हता धारण करण्यापूर्वीच्या अनुभवाची नोंद करण्यात येऊ नये. त्याची दखल घेतली जाणार नाही.
- अनुभवाचा तपशिल नमूद करताना पहिली नियुक्ती कालावधी ते सध्याची नियुक्ती कालावधी या क्रमानेच द्यावा.
- अनुभवाचा तपशिल नमूद असताना ज्या कार्यालयाचे अनुभव प्रमाणपत्र प्राप्त आहे अशाच कार्यालयाचा तपशिल फॉम मध्ये नमूद करावा. अनुभव प्रमाणपत्र नसल्यास सदरचा अनुभव ग्राहया धरण्यात येणार नाही. अनुभव प्रमाणपत्रामध्ये अनुभवाचा कालावधी सुस्पष्टपणे नमूद असावा.
- अनुभवाचा तपशिल नमूद करताना रुजू दिनांक व कार्यमुक्तीचा दिनांक अचूकपणे नमूद करावा. दोनही तारखा प्रमाणपत्रानुसारच नोंदविण्याची दक्षता घ्यावी. यामध्ये तफावत आढळल्यास अशा अनुभवाचा ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरीक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.
- ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता आवश्यक असलेला अनुभवच ग्राहय धरण्यात येईल. या व्यतिरीक्त इतर अनुभव असल्यास असा अनुभव विचारात घेतला जाणार नाही.

**(क) संगणक अर्हता व इतर :-**

१) MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा त्याबाबतचा तपशिल नमूद करावा.
२) एमडी अर्हताधारकांचे एमएनसी कडील नोंदणी अद्यावत असणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

**(ड) लहान कुटूंबाचे प्रमाणपत्रः-**

१) शासनाच्या धोरणनुसार उमेदवारास लहान कुटूंब धोरणाचे पालन करणे आवश्यक राहील.
२) उमेदवाराने आपण मुलाखतीस पात्र झाल्यास छाननी दरम्यान या अनुषंगाने प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
३) सदर लहान कुटूंबाचे प्रमाणपत्राचा नमुना सोबत जोडला आहे.

८) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.
९) अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
१०) उमेदवारांनी अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व **सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.**
११) सदर रिक्त पदांच्या संख्येत, तसेच पदस्थापनेच्या ठिकाणमध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत आवश्यकतेनुसार बदल करण्याचे वा सदर पदभरती अंशतः किंवा पुर्ण रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा प्रमूख वैद्यकीय अधिकारी, राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केद्रं,नागपूर यांनी राखुन ठेवलेले आहेत.
१२) निवड यादीतील गुणानुक्रमांकाच्या आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.
१३) जाहिरातीच्या अंतिम दिनांकास सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. ( तसेच एनएचएम अंतर्गत काम करीत असलेल्या उमेदवारांना ५ वर्षे वयोमर्यादा शिथिल राहील.)
१४) उपरोक्त पदाकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन गुणानुक्रमे यादी तयार करण्यात येईल गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. भरती प्रक्रिया स्थगित करणे/ रद्द करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार निवड समितीकडे राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.
१५) मागासवर्गीय उमेदवारानी अर्ज आरक्षणामधुन सादर करावयाचा असल्यास, अर्जासोबत जात प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहिल. अर्जाचा नमुना हा website www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in ) या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास,उमेदवाराचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजु होताना सादर करावा लागेल.
१६) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासुन ७ दिवसांमध्ये नियुक्तीच्या ठिकाणी रुजु होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश आपोआप संपुष्टात आणण्यात येईल व प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल.
१७) पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहे.

| विवरण | तपशिल | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion= काढावे. ( उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५० % प्रमाणे Proportion = ६०*५०/१००= ३० ) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी ) | अधिकतम २० गुण द्यावेत . मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे (उदा. १ Microbiology पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवारांस M.Sc.Medical Microbiology हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवारांने अर्ज केला | २० गुण |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | असल्यास उमेदवारांस M.Sc.Medical Microbiology च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०%गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००= १२ ) | |
| संबंधित पदाची निगडित अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. ( १ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |

* वरीलप्रमाणे गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१८) पदभरतीबाबतची अदयावत स्थिती वरील नमुद केलेल्याwebsite www.nhm.maharashtra.gov.in & www.arogya.maharashtra.gov.in ) वर कळविण्यात येईल.

अध्यक्ष निवड समिती
तथा
प्रमुख वैद्यकीय अधिकारी
राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केद्रं,
नागपुर

Scanned with OKEN Scanner

SBI

ADM OFFICER STATE TUBERCULOSI

# SCAN & PAY

UPI ID: 9823312803@sbi

BHIM
BHARAT INTERFACE FOR MONEY

UPI
UNIFIED PAYMENTS INTERFACE

yono SBI

BHIM SBI Pay

G Pay

paytm

Pay

Scanned with OKEN Scanner

 (9)

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रं. :-

पासपोर्ट आकाराचा अलिकडील छायाचित्र स्वता:साक्षांकित करुन लावावे करावा

प्रति,

**पदाचे नांव :** ........................................
**पद स्थापना कार्यक्षेत्र :**..................................

१) उमेदवारांचे संपूर्ण नांव :- ..........................................
२) उमेदवारांच्या वडिलांचे संपूर्ण नाव :-.......................................
३) जन्म तारीख :- .............................
:- दिनांक ........ महिना......... वर्ष..........
अक्षरी ................................................
................................................

वय :- .............. वर्षे पुर्ण ........ महिने....... दिवस......

(जाहिरात प्रसिध्द झाले त्या दिवशी)

४) राहण्याचा पत्ता :- ....................................................
....................................................
....................................................
(मोबाईल नंबर :- ....................) (नमुद करणे अनिवार्य)
(ई मेल आयडि :-.......................................)

५) अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे :- होय / नाही
६) अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे :- होय /नाही जातीचा प्रवर्ग :- ..............
जातीचे नाव :- ............
...
<u>अर्जदार अर्ज सादर करत असलेल्या जातीचा प्रवर्ग (नमुद करणे अनिवार्य )</u> :-............
......

७) शुल्क अदा केल्याची पावती सोबत जोडली आहे काय ? :- होय / नाही.
Transaction ID No- व दिनांक व रक्कम :- ........................................

८) अर्जदार विवाहीत आहे किंवा नाही ? :- ........................................

Scanned with OKEN Scanner

९) शैक्षणिक पात्रता :-

| धारण केलेली पदवी अर्हता तपशिल (सर्व) | बोर्ड/विद्यापीठाचे नांव | उत्तीर्ण वर्ष | एकुण गुण पैकी मिळालेले गुण (अंतिम वर्षाचे किंवा शेवटचे दोन सेमिस्टरचे गुण ) | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

१०) अनुभव :- अनुभवाची साक्षांकित प्रत जोडावी [

| अं. क्रं. | काम केलेल्या कार्यालयांचे नांव व पत्ता | धारण केलेले पद | कालावधी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वर्ष | महिने | दिवस |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

११) अर्जासोबत खालिल साक्षांकित प्रती जोडल्या आहेत. (सर्व कागदपत्रांवरती पृष्ठ क्रंमाक नमुद करावा)

१)..................................... २).....................................

३)..................................... ४).....................................

५)..................................... ६).....................................

७)..................................... ८).....................................

९)..................................... १०).....................................

१२) वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे खरा आणि बरोबर आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे मी असे ही प्रमाणीत करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास नोकरी गमावल्यास व त्या अनुषंगाने होणा-या सर्व कारवाईस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातील नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन त्या मला मान्य आहेत.

ठिकाण :- नागपूर

दिनांक :- / /२०२६

.......

स्वाक्षरी :- ........................

अर्जदारांचे नांव :-.................

Scanned with OKEN Scanner

## लहान कुटूबांचे प्रमाणपत्र - नमुना

मी श्री/श्रीमती/कुमारी ......................................................................................

श्री......................................................................................

मुलगा/मुलगी/पत्नी वय .................. वर्ष............ राहणार........................

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी .............................................................या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ...................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्या पैकी दिनांक २३ जुलै २०२० या नंतर जन्माला आलेल्या मुलाची संस्ख्या ............... इतकी आहे.

( असल्यास जन्म दिनांक १) / / २) / /

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे शासकीय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

अर्जदार स्वाक्षरी -

अर्जदाराचे नाव -

ठिकाण :-

दिनांक :-

Scanned with OKEN Scanner